॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक १६ ॥

॥ दशक सोळावा : सप्ततिन्वय ॥१६॥

समास पहिला : वाल्मीकि स्तवननिरूपण

॥ श्रीराम ॥

धन्य धन्य तो वाल्मीक । ऋषीमाजी पुण्यश्लोक ।
जयाचेन हा त्रिलोक्य । पावनजाला ॥ १॥
भविष्य आणी शतकोटी । हें तों नाहीं देखिलें दृष्टीं ।
धांडोळितां सकळ सृष्टि । श्रुत नव्हे ॥ २॥
भविष्याचें येक वचन । कदाचित जालें प्रमाण ।
तरी आश्चिर्य मानिती जन । भूमंडळीचे ॥ ३॥
नसतां रघुनाथअवतार । नाहीं पाहिला शास्त्राधार ।
रामकथेचा विस्तार । विस्तारिला जेणें ॥ ४॥
ऐसा जयाचा वाग्विळास । ऐकोनी संतोषला महेश ।
मग विभागिलें त्रयलोक्यास । शतकोटी रामायेण ॥ ५॥
ज्याचें कवित्व शंकरें पाहिलें । इतरां न वचे अनुमानलें ।
रामउपासकांसी जालें । परम समाधान ॥ ६॥
ऋषी होते थोर थोर । बहुतीं केला कवित्वविचार ।
परी वाल्मीकासारिखा कवेश्वर । न भूतो न भविष्यति ॥ ७॥
पूर्वी केलीं दुष्ट कर्में । परी पावन जाला रामनामें ।
नाम जपतां दृढ नेमें । पुण्यें सीमा सांडिली ॥ ८॥
उफराटे नाम म्हणतां वाचें । पर्वत फुटले पापाचे ।
ध्वज उभारले पुण्याचे । ब्रह्मांडावरुते ॥ ९॥
वाल्मीकें जेथें तप केलें । तें वन पुण्यपावन जालें ।
शुष्क काष्टीं अंकुर फुटले । तपोबळें जयाच्या ॥ १०॥
पूर्वी होता वाल्हाकोळी । जीवघातकी भूमंडळीं ।
तोचि वंदिजे सकळीं । विबुधीं आणि ऋषेश्वरीं ॥ ११॥
उपरती आणि अनुताप । तेथें कैंचें उरेल पाप ।
देह्यांततपें पुण्यरूप । दुसरा जन्म जाला ॥ १२॥
अनुतापें आसन घातलें । देह्यांचें वारुळ जालें ।
तेंचि नाम पुढें पडिलें । वाल्मीक ऐसें ॥ १३॥
वारुळास वाल्मीक बोलिजे । म्हणोनि वाल्मीक नाम साजे ।
जयाच्या तीव्र तपें झिजे । हृदय तापसाचें ॥ १४॥
जो तापसांमाजीं श्रेष्ठ । जो कवेश्वरांमधें वरिष्ठ ।
जयाचें बोलणें पष्ट । निश्चयाचें ॥ १५॥
जो निष्ठावंतांचें मंडण । रघुनाथभक्तांचें भूषण ।
ज्याची धारणा असाधारण । साधकां सदृढ करी ॥ १६॥
धन्य वाल्मीक ऋषेश्वर । समर्थाचा कवेश्वर ।
तयासी माझा नमस्कार । साष्टांगभावें ॥ १७॥
वाल्मीक ऋषी बोलिला नसता । तरी आम्हांसी कैंची रामकथा ।
म्हणोनियां समर्था । काय म्हणोनी वर्णावें ॥ १८॥
रघुनाथकीर्ति प्रगट केली । तेणें तयाची महिमा वाढली ।
भक्त मंडळी सुखी जाली । श्रवणमात्रें ॥ १९॥
आपुला काळ सार्थक केला । रघुनाथकीर्तिमधें बुडाला ।
भूमंडळीं उधरिला । बहुत लोक ॥ २०॥
रघुनाथ भक्त थोर थोर । महिमा जयांचा अपार ।
त्या समस्तांचा किंकर । रामदास म्हणे ॥ २१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
वाल्मीकस्तवननिरूपणनाम समास पहिला ॥ १॥ १६.१

समास दुसरा : सूर्यस्तवननिरूपण

॥ श्रीराम ॥

धन्य धन्य हा सूर्यवौंश । सकळ वौंशामधें विशेष ।
मार्तंडमंडळाचा प्रकाश । फांकला भूमंडळीं ॥ १॥
सोमाआंगीं आहे लांछन । पक्षा येका होय क्षीण ।
रविकिर्ण फांकता आपण । कळाहीन होये ॥ २॥
याकारणें सूर्यापुढें । दुसरी साम्यता न घडे ।
जयाच्या प्रकाशें उजेडे । प्राणीमात्रासी ॥ ३॥
नाना धर्म नाना कर्में । उत्तमें मध्यमें अधमें ।
सुगमें दुर्गमें नित्य नेमें । सृष्टीमधें चालती ॥ ४॥
वेदशास्त्रें आणी पुराणें । मंत्र यंत्र नाना साधनें ।
संध्या स्नान पूजाविधानें । सूर्येंविण बापुडीं ॥ ५॥
नाना योग नाना मतें । पाहों जातां असंख्यातें ।
जाती आपुलाल्या पंथें । सूर्यउदय जालियां ॥ ६॥
प्रपंचिक अथवा परमार्थिक । कार्य करणें कोणीयेक ।
दिवसेंविण निरार्थक । सार्थक नव्हे ॥ ७॥
सूर्याचें अधिष्ठान डोळे । डोळे नसतां सर्व आंधळे ।
याकारणें कांहींच न चले । सूर्येंविण ॥ ८॥
म्हणाल अंध कवित्वें करिती । तरी हेहि सुर्याचीच गती ।
थंड जालियां आपुली मती । मग मतिप्रकाश कैंचा ॥ ९॥
उष्ण प्रकाश तो सूर्याचा । शीत प्रकाश तो चंद्राचा ।
उष्णत्व नस्तां देह्याचा । घात होये ॥ १०॥
याकारणें सूर्येंविण । सहसा न चले कारण ।
श्रोते तुम्ही विचक्षण । शोधून पाहा ॥ ११॥
हरिहरांच्या अवतारमूर्ती । शिवशक्तीच्या अनंत वेक्ती ।
यापूर्वी होता गभस्ती । आतां हि आहे ॥ १२॥
जितुके संसारासि आले । तितुके सूर्याखालें वर्तले ।

अंती देहे त्यागून गेले । प्रभाकरादेखतां ॥ १३ ॥
चंद्र ऐलीकडे जाला । क्षीरसागरीं मधून काढिला ।
चौदा रत्नांमधें आला । बंधु लक्ष्मीचा ॥ १४ ॥
विश्वचक्षु हा भास्कर । ऐसें जाणती लाहानथोर ।
याकारणें दिवाकर । श्रेष्ठांहून श्रेष्ठ ॥ १५ ॥
अपार नभमार्ग क्रमणें । ऐसेंचि प्रत्यहीं येणें जाणें ।
या लोकोपकाराकारणें । आज्ञा समर्थाची ॥ १६ ॥
दिवस नस्तां अंधकार । सर्वांसी नकळे सारासार ।
दिवसेंविण तश्कर । कां दिवाभीत पक्षी ॥ १७ ॥
सूर्यापुढें आणिक दुसरें । कोण आणावें सामोरें ।
तेजोरासी निर्धारें । उपमेरहित ॥ १८ ॥
ऐसा हा सविता सकळांचा । पूर्वज होय रघुनाथाचा ।
अगाध महिमा मानवी वाचा । काये म्हणोनि वर्णावी ॥ १९ ॥
रघुनाथवौंश पूर्वापर । येकाहूनि येक थोर ।
मज मतिमंदास हा विचार । काये कळे ॥ २० ॥
रघुनाथाचा समुदाव । तेथें गुंतला अंतर्भाव ।
म्हणोनी वर्णितां महत्व । वाग्दुर्बळ मी ॥ २१ ॥
सकळ दोषाचा परिहार । करितां सूर्यास नमस्कार ।
स्फूर्ति वाढे निरंतर । सूर्यदर्शन घेतां ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सूर्यस्तवननिरूपणनाम समास दुसरा ॥ २ ॥ १६.२

समास तिसरा : पृथ्वीस्तवननिरूपण
॥ श्रीराम ॥
धन्य धन्य हे वसुमती । इचा महिमा सांगों किती ।
प्राणीमात्र तितुके राहाती । तिच्या आधारें ॥ १ ॥
अंतरिक्ष राहाती जीव । तोहि पृथ्वीचा स्वभाव ।
देहे जड नस्तां जीव । कैसे तगती ॥ २ ॥
जाळिती पोळिती कुदळिती । नांगरिती उकरिती खाणती ।
मळ मूत्र तिजवरी करिती । आणी वमन ॥ ३ ॥
नासकें कुजकें जर्जर । पृथ्वीविण कैंची थार ।
देह्यांतकाळीं शरीर । तिजवरी पडे ॥ ४ ॥
बरें वाईट सकळ कांहीं । पृथ्वीविण थार नाहीं ।
नाना धातु द्रव्य तें हि । भूमीचे पोटीं ॥ ५ ॥
येकास येक संव्हारिती । प्राणी भूमीवरी असती ।
भूमी सांडून जाती । कोणीकडे ॥ ६ ॥
गड कोठ पुरें पट्टणें । नाना देश कळती अटणें ।
देव दानव मानव राहाणें । पृथ्वीवरी ॥ ७ ॥
नाना रत्नें हिरे परीस । नाना धातु द्रव्यांश ।
गुप्त प्रगट कराव्यास । पृथ्वीविण नाहीं ॥ ८ ॥
मेरुमांदार हिमाचळ । नाना अष्टकुळाचळ ।
नाना पक्षी मछ व्याळ । भूमंडळीं ॥ ९ ॥
नाना समुद्रापैलीकडे । भोंवतें आवर्णोदका कडें ।
असंभाव्य तुटले कडे । भूमंडळाचे ॥ १० ॥
त्यामधें गुप्त विवरें । लाहानथोरें अपारें ।
तेथें निबिड अंधकारें । वस्ती कीजे ॥ ११ ॥
आवर्णोदक तें अपार । त्याचा कोण जाणे पार ।
उदंड दाटले जळचर । असंभाव्य मोठे ॥ १२ ॥
त्या जीवनास आधार पवन । निबिड दाट आणी घन ।
फुटों शकेना जीवन । कोणेकडे ॥ १३ ॥
त्या प्रभंजनासी आधार । कठिणपणें अहंकार ।
ऐसा त्या भूगोळाचा पार । कोण जाणे ॥ १४ ॥
नाना पदार्थांच्या खाणी । धातुरत्नांच्या दाटणी ।
कल्पतरु चिंतामणी । अमृतकुंडें ॥ १५ ॥
नाना दीपें नाना खंडें । वसती उद्वसें उदंडें ।
तेथें नाना जीवनाचीं बंडें । वेगळालीं ॥ १६ ॥
मेरुभोंवते कडे कापले । असंभाव्य कडोसें पडिलें ।
निबिड तरु लागले । नाना जिनसी ॥ १७ ॥
त्यासन्निध लोकालोक । जेथें सूर्याचें फिरे चाक ।
चंद्रादि द्रोणाद्रि मैनाक । माहां गिरी ॥ १८ ॥
नाना देशीं पाषाणभेद । नाना जिनसी मृत्तिकाभेद ।
नाना विभूति छंद बंद । नाना खाणी ॥ १९ ॥
बहुरत्न हे वसुंदरा । ऐसा पदार्थ कैचा दुसरा ।
अफाट पडिलें सैरावैरा । जिकडे तिकडे ॥ २० ॥
अवघी पृथ्वी फिरोन पाहे । ऐसा प्राणी कोण आहे ।
दुजी तुळणा न साहे । धरणीविषीं ॥ २१ ॥
नाना वल्ली नाना पिकें । देसोदेसी अनेकें ।
पाहों जातां सारिख्या सारिखें । येक हि नाहीं ॥ २२ ॥
स्वर्ग मृत्यु आणिपाताळें । अपूर्व रचिलीं तीन ताळें ।
पाताळलोकीं माहां व्याळें । वस्ती कीजे ॥ २३ ॥
नाना वल्ली बीजांची खाणी । ते हे विशाळ धरणी ।
अभिनव कर्त्याची करणी । होऊन गेली ॥ २४ ॥
गड कोठ नाना नगरें । पुरें पट्टणें मनोहरें ।
सकळां ठाईं जगदेश्वरें । वस्ती कीजे ॥ २५ ॥
माहां बळी होऊन गेले । पृथ्वीवरी चौताळले ।
सामर्थ्यें निराळे राहिले । हें तों घडेना ॥ २६ ॥
असंभाव्य हे जगती । जीव कितीयेक जाती ।
नाना अवतारपंगती । भूमंडळावरी ॥ २७ ॥
सध्यां रोकडे प्रमाण । कांहीं करावा नलगे अनुमान ।
नाना प्रकारीचें जीवन । पृथ्वीचेनि आधारें ॥ २८ ॥
कित्तेक भूमी माझी म्हणती । सेवटीं आपणचि मरोन जाती ।
कित्तेक काळ होतां जगती । जैसी तैसी ॥ २९ ॥
ऐसा पृथ्वीचा महिमा । दुसरी काये द्यावी उपमा ।
ब्रह्मादिकापासुनी आम्हां । आश्रयोचि आहे ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
पृथ्वीस्तवननिरूपणनाम समास तिसरा ॥ ३ ॥ १६.३

समास चौथा : आपनिरूपण

॥ श्रीराम ॥
आतां सकळांचे जन्मस्थान । सकळ जीवांचे जीवन ।
जयास आपोनारायेण । ऐसें बोलिजे ॥ १॥
पृथ्वीस आधार आवर्णोदक । सप्तसिंधूचें सिंधोदक ।
नाना मेघीचें मेघोदक । भूमंडळीं चालिलें ॥ २॥
नाना नद्या नाना देसीं । वाहात मिळाल्या सागरासी ।
लाहानथोर पुण्यरासी । अगाध महिमे ॥ ३॥
नद्या पर्वतींहून कोंसळल्या । नाना सांकडीमधें रिचविल्या ।
धबाबां खळाळां चालिल्या । असंभाव्य ॥ ४॥
कूप बावी सरोवरें । उदंड तळीं थोरथोरें ।
निर्मळें उचंबळती नीरें । नाना देसीं ॥ ५॥
गायेमुखें पाट जाती । नाना कालवे वाहती ।
नाना झऱ्या झिरपती । झरती नीरें ॥ ६॥
डुरें विहीरें पाझर । पर्वत फुटोन वाहे नीर ।
ऐसे उदकाचे प्रकार । भूमंडळीं ॥ ७॥
जितुके गिरी तितुक्या धारा । कोंसळती भयंकरा ।
पाभळ वाहाळा अपारा । उकळ्या सांडिती ॥ ८॥
भूमंडळीचें जळ आघवें । किती म्हणोनी सांगावें ।
नाना कारंजीं आणावें । बांधोनी पाणी ॥ ९॥
डोहो डवके खबाडीं टांकीं । नाना गिरिकंदरीं अनेकीं ।
नाना जळें नाना लोकीं । वेगळालीं ॥ १०॥
तीर्थे येकाहून येक । माहां पवित्र पुण्यदायक ।
अगाध महिमा शास्त्रकारक । बोलोनि गेले ॥ ११॥
नाना तीर्थांची पुण्योदकें । नाना स्थळोस्थळीं सीतळोदकें ।
तैसींच नाना उष्णोदकें । ठाई ठाई ॥ १२॥
नाना वल्लीमधें जीवन । नाना फळीं फुलीं जीवन ।
नाना कंदीं मुळीं जीवन । गुणकारकें ॥ १३॥
क्षीरोदकें सिंधोदकें । विषोदकें पीयूषोदकें ।
नाना स्थळांतरीं उदकें । नाना गुणाचीं ॥ १४॥
नाना युक्षदंडाचे रस । नाना फळांचे नाना रस ।
नाना प्रकारीचे गोरस । मद पारा गुळत्र ॥ १५॥
नाना मुक्तफळांचें पाणी । नाना रत्नी तळपें पाणी ।
नाना शस्त्रामधें पाणी । नाना गुणाचें ॥ १६॥
शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । नाना उदकाचे नाना भेद ।
विवरोन पाहातां विशद । होत जातें ॥ १७॥
उदकाचे देह केवळ । उदकाचेंचि भूमंडळ ।
चंद्रमंडळ सूर्यमंडळ । उदकाकरितां ॥ १८॥
क्षारसिंधु क्षीरसिंधु । सुरासिंधु आज्यसिंधु ।
दधिसिंधु युक्षरससिंधु । शुद्ध सिंधु उदकाचा ॥ १९॥
ऐसें उदक विस्तारलें । मुळापासून सेवटा आलें ।
मधेहि ठाई ठाई उमटलें । ठाई ठाई गुप्त ॥ २०॥
जे जे बीजीं मिश्रीत जालें । तो तो स्वाद घेऊन उठिलें ।
उसामधें गोडीस आलें । परम सुंदर ॥ २१॥
उदकाचें बांधा हें शरीर । उदक चि पाहिजे तदनंतर ।
उदकचि उत्पत्तिविस्तार । किती म्हणोनी सांगावा ॥ २२॥
उदक तारक उदक मारक । उदक नाना सौख्यदायेक ।
पाहातां उदकाचा विवेक । अलोलीक आहे ॥ २३॥
भूमंडळीं धांवे नीर । नाना ध्वनी त्या सुंदर ।
धबाबां धबाबां थोर । रिचवती धारा ॥ २४॥
ठाई ठाई डोहो तुंबती । विशाळ तळीं डबाबिती ।
चबाबिती थबाबिती । कालवे पाट ॥ २५॥
येकी पालथ्या गंगा वाहाती । उदकें सन्निधचि असती ।
खळाळां झरे वाहाती । भूमीचे पोटीं ॥ २६॥
भूगर्भी डोहो भरलें । कोण्ही देखिले ना ऐकिले ।
ठाई ठाई झोवीरे जाले । विदुल्यतांचे ॥ २७॥
पृथ्वीतळीं पाणी भरलें । पृथ्वीमधें पाणी खेळे ।
पृथ्वीवरी प्रगटलें । उदंड पाणी ॥ २८॥
स्वर्गमृत्यपाताळीं । येक नदी तीन ताळीं ।
मेघोदक अंतराळीं । वृष्टी करी ॥ २९॥
पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ दहन ।
दहनाचें मूळ पवन । थोराहून थोर ॥ ३०॥
त्याहून थोर परमेश्वर । महद्भूतांचा विचार ।
त्याहून थोर परात्पर । परब्रह्म जाणावें ॥ ३१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आपनिरूपणनाम समास चौथा ॥ ४॥ १६.४

समास पांचवा : अग्निनिरूपण

॥ श्रीराम ॥
धन्य धन्य हा वैश्वानरु । होये रघुनाथाचा श्वशुरु ।
विश्वव्यापक विश्वंभरु । पिता जानकीचा ॥ १॥
ज्याच्या मुखें भगवंत भोक्ता । जो ऋषीचा फळदाता ।
तमहिमरोगहर्ता । भर्ता विश्वजनाचा ॥ २॥
नाना वर्ण नाना भेद । जीवमात्रास अभेद ।
अभेद आणी परम शुध । ब्रम्हादिकासी ॥ ३॥
अग्नीकरितां सृष्टी चाले । अग्नीकरितां लोक धाले ।
अग्नीकरितां सकळ ज्याले । लाहानथोर ॥ ४॥
अग्नीनें आळलें भूमंडळ । लोकांस राहव्या जालें स्थळ ।
दीप दीपिका नाना ज्वाळ । जेथें तेथें ॥ ५॥
पोटामधें जठराग्नी । तेणें क्षुधा लागे जनीं ।
अग्नीकरितां भोजनीं । रुची येते ॥ ६॥
अग्नी सर्वांगीं व्यापक । उष्णें राहे कोणी येक ।
उष्ण नस्तां सकळ लोक । मरोन जाती ॥ ७॥
आधीं अग्नी मंद होतो । पुढें प्राणी तो नासतो ।
ऐसा हा अनुभव येतो । प्राणीमात्रासी ॥ ८॥
असतां अग्नीचें बळ । शत्रु जिंके तात्काळ ।
अग्नी आहे तावत्काळ । जिणें आहे ॥ ९॥
नाना रस निर्माण जाले । अग्नीकरितां निपजले ।

माहांरोगी आरोग्य जाले । निमिषमात्रें ॥ १० ॥
सूर्य सकळांहून विशेष । सूर्याउपरी अग्नीप्रकाश ।
रात्रभागीं लोक अग्नीस । साहें करिती ॥ ११ ॥
अंत्यजगृहींचा अग्नी आणिला । त्यास दोष नाहीं बोलिला ।
सकळां गृहीं पवित्र जाला । वैश्वानरु ॥ १२ ॥
अग्नीहोत्र नाना याग । अग्नीकरितां होती सांग ।
अग्नी त्रुप्त होतां मग । सुप्रसन्न होतो ॥ १३ ॥
देव दानव मानव । अग्नीकरितां चाले सर्व ।
सकळ जनासी उपाव । अग्नी आहे ॥ १४ ॥
लग्नें करिती थोर थोर । नाना दारूचा प्रकार ।
भूमंडळीं यात्रा थोर । दारूनें शोभती ॥ १५ ॥
नाना लोक रोगी होती । उष्ण औशधें सेविती ।
तेणे लोक आरोग्य होती । वन्हीकरितां ॥ १६ ॥
ब्राह्मणास तनुमनु । सूर्यदेव हुताशनु ।
येतद्विषई अनुमानु । कांहींच नाहीं ॥ १७ ॥
लोकामध्यें जठरानळु । सागरीं आहे वडवनाळु ।
भूगोळाबाहेर आवर्णानळु । शिवनेत्रीं विदुल्यता ॥ १८ ॥
कुपीपासून अग्नी होतो । उंचदर्पणीं अग्नी निघतो ।
काष्ठमंथनी प्रगटतो । चकमकेनें ॥ १९ ॥
अग्नी सकळां ठाई आहे । कठीण घिसणीं प्रगट होये ।
आग्यासर्पें दग्ध होये । गिरिकंदरें ॥ २० ॥
अग्नीकरितां नाना उपाये । अग्नीकरितां नाना अपाय ।
विवेकेंविण सकल होये । निरार्थक ॥ २१ ॥
भूमंडळीं लाहानथोर । सकळांस वन्हीचा आधार ।
अग्निमुखें परमेश्वर । संतुष्ट होये ॥ २२ ॥
ऐसा अग्नीचा महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा ।
उत्तरोत्तर अगाध महिमा । अग्नीपुरुषाचा ॥ २३ ॥
जीत असतां सुखी करी । मेल्यां प्रेत भस्म करी ।
सर्वभक्षकु त्याची थोरी । काये म्हणोनी सांगावी ॥ २४ ॥
सकळ सृष्टीचा संव्हार । प्रळय करी वैश्वानर ।
वैश्वानरें पदार्थमात्र । कांहींच उरेना ॥ २५ ॥
नाना होम उदंड करिती । घरोघरीं वैशदेव चालती ।
नाना क्षेत्रीं दीप जळती । देवापासीं ॥ २६ ॥
दीपाराधनें निलांजनें । देव वोवाळिजे जनें ।
खरें खोटें निवडणें । दिव्य होतां ॥ २७ ॥
अष्टधा प्रकुर्ती लोक तिन्ही । सकळ व्यापून राहिला वन्ही ।
अगाध महिमा वदनीं । किती म्हणोनी बोलावा ॥ २८ ॥
च्यारी शृंगें त्रिपदीं जात । दोनी शिरें सप्त हात ।
ऐसा बोलिला शास्त्रार्थ । प्रचितीविण ॥ २९ ॥
ऐसा वन्ही उष्णमूर्ती । तो मी बोलिलों येथामती ।
न्यून्यपूर्ण क्षमा श्रोतीं । केलें पाहिजे ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
अग्निनिरूपणनाम समास पांचवा ॥ ५ ॥ १६.५

समास सहावा : वायुस्तवन

॥ श्रीराम ॥

धन्य धन्य हा वायुदेव । याचा विचित्र स्वभाव ।
वायोकरितां सकळ जीव । वर्तती जनीं ॥ १ ॥
वायोकरितां श्वासोश्वास । नाना विद्यांचा अभ्यास ।
वायोकरितां शरीरास । चळण घडे ॥ २ ॥
चळण वळण प्रासारण । निरोधन आणी आकोचन ।
प्राण अपान व्यान उदान । समान वायु ॥ ३ ॥
नाग कूर्म कर्कश वायो । देवदत्त धनंजयो ।
ऐसे हे वायोचे स्वभावो । उदंड असती ॥ ४ ॥
वायो ब्रह्मांडीं प्रगटला । ब्रह्मांडदेवतांस पुरवला ।
तेथुनी पिंडी प्रगटला । नाना गुणें ॥ ५ ॥
स्वर्गलोकीं सकळ देव । तैसेचि पुरुषार्थी दानव ।
मृत्यलोकींचे मानव । विख्यात राजे ॥ ६ ॥
नरदेहीं नाना भेदे । अनंत भेदाचीं श्वापदें ।
वनचरें जळचरें आनंदें । क्रीडा करिती ॥ ७ ॥
त्या समस्तांमधें वायु खेळे । खेचरकुळ अवघें चळे ।
उठती वन्हीचे उबाळे । वायोकरितां ॥ ८ ॥
वायो मेघाचें भरण भरी । सवेंच पिटून परतें सारी ।
वायो ऐसा कारबारी । दुसरा नाहीं ॥ ९ ॥
परी ते आत्मयाची सत्ता । वर्ते शरीरीं तत्वता ।
परी व्यापकपणें या समर्था । तुळणा नाहीं ॥ १० ॥
गिरीहून दाट फौजा । मेघ उठिले लोककाजा ।
गर्जगर्जों तडक विजा । वायोबळें ॥ ११ ॥
चंद्रसूर्य नक्षत्रमाळा । ग्रहमंडळें मेघमाळा ।
यें ब्रह्मांडीं नाना कळा । वायोकरितां ॥ १२ ॥
येकवटलें तें निवडेना । कालवलें तें वेगळें होयेना ।
तैसें हे बेंचाड नाना । केवी कळे ॥ १३ ॥
वायो सुटे सरारां । असंभाव्य पडतीगारा ।
तैसे जीव हे नीरास्र । सरिसे पडती ॥ १४ ॥
वायुरूपें कमळकळा । तोचि आधार जळा ।
तया जळाच्या आधारें भूगोळा । शेषें धरिलें ॥ १५ ॥
शेषास पवनाचा आहार । आहारें फुगे शरीर ।
तरी मग घेतला भार । भूमंडळाचा ॥ १६ ॥
माहांकूर्माचें शरीर भलें । नेणों ब्रह्मांड पालथें घातलें ।
येवढें शरीर तें राहिलें । वायोचेनी ॥ १७ ॥
वाराहें आपुलें दंतीं । पृथ्वी धरिली होती ।
तयाची येवढी शक्ती । वायुबळें ॥ १८ ॥
ब्रह्म विष्णु महेश्वर । चौथा आपण जगदेश्वर ।
वायोस्वरूप विचार । विवेकी जाणती ॥ १९ ॥
तेतिस कोटी सुरवर । अठ्यासी सहस्र ऋषेश्वर ।
सिध योगी भारेंभार । वायोकरितां ॥ २० ॥
नव कोटी कात्यायणी । छेपन कोटी च्यामुंडिणी ।

औट कोटी भूतखाणी । वायोरूपें ॥ २१॥
भूतें देवतें नाना शक्ती । वायोरूप त्यांच्या वेक्ती ।
नाना जीव नेणो किती । भूमंडळीं ॥ २२॥
पिंडीं ब्रह्मांडीं पुरवला । बाहेर कंचुकास गेला ।
सकळां ठाईं पुरवला । समर्थ वायु ॥ २३॥
ऐसा हा समर्थ पवन । हनुमंत जयाचा नंदन ।
रघुनाथस्मरणीं तनमन । हनुमंताचें ॥ २४॥
हनुमंत वायोचा प्रसीध । पित्यापुत्रांस नाहीं भेद ।
म्हणोनि दोघेहि अभेद । पुरुषार्थविषीं ॥ २५॥
हनुमंतास बोलिजे प्राणनाथ । येणें गुणें हा समर्थ ।
प्राणेंविण सकळ वेर्थ । होत जातें ॥ २६॥
मागें मृत्य आला हनुमंता । तेव्हां वायो रोधला होता ।
सकळ देवांस आवस्ता । प्राणांत मांडलें ॥ २७॥
देव सकळ मिळोन । केलें वायुचें स्तवन ।
वायो प्रसन्न होऊन । मोकळें केलें ॥ २८॥
म्हणोनि प्रतापी थोर । हनुमंत ईश्वरी अवतार ।
याचा पुरुषार्थ सुरवर । पाहातचि राहिले ॥ २९॥
देव कारागृहीं होते । हनुमंतें देखिलें अवचितें ।
संव्हार करूनी लंकेभोंवतें । विटंबून पाडिलें ॥ ३०॥
उसिणें घेतलें देवांचें । मूळ शोधिलें राक्षसांचें ।
मोठें कौतुक पुछ्यकेताचें । आश्चर्य वाटे ॥ ३१॥
रावण होता सिंह्यासनावरी । तेथें जाऊन ठोंसरे मारी ।
लंकेमधें निरोध करी । उदक कैचें ॥ ३२॥
देवास आधार वाटला । मोठा पुरुषार्थ देखिला ।
मनामधें रघुनाथाला । करुणा करिती ॥ ३३॥
दैत्य आवघे संव्हारिले । देव तत्काळ सोडिले ।
प्राणीमात्र सुखी जाले । त्रयलोक्यवासी ॥ ३४॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
वायोस्तवननिरूपणनाम समास सहावा ॥ ६॥ १६.६

समास सातवा : महद्भूतनिरूपण

॥ श्रीराम ॥
पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ अग्न ।
अग्नीचें मूळ पवन । मागां निरोपिलें ॥ १॥
आतां ऐका पवनाचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ ।
अत्यंतचि चंचळ । सकळांमधें ॥ २॥
तो येतो जातो दिसेना । स्थिर होऊन बैसेना ।
ज्याचें रूप अनुमानेना । वेदश्रुतीसी ॥ ३॥
मुळीं मुळींचें स्फुर्ण । तेंचि अंतरात्म्याचें लक्षण ।
जगदेश्वरापासून त्रिगुण । पुढें जालें ॥ ४॥
त्रिगुणापासून जालीं भूतें । पावलीं पष्ट दशेतें ।
त्या भूतांचें स्वरूप तें । विवेकें वोळखावें ॥ ५॥
त्यामधें मुख्य आकाश । चौ भूतांमधें विशेष ।
याच्या प्रकाशें प्रकाश । सकळ कांहीं ॥ ६॥
येक विष्णु महद्भूत । ऐसा भूतांचा संकेत ।
परंतु याची प्रचीत । पाहिली पाहिजे ॥ ७॥
विस्तारें बोलिलीं भूतें । त्या भूतामधें व्यापक तें ।
विवरोन पाहातां येतें । प्रत्ययासी ॥ ८॥
आत्मयाच्या चपळपणापुढें । वायो तें किती बापुडें ।
आत्म्याचें चपळपण रोकडें । समजोन पाहावें ॥ ९॥
आत्म्यावेगळें काम चालेना । आत्मा दिसेना ना आडळेना ।
गुप्तरूपें विचार नाना । पाहोन सोडी ॥ १०॥
पिंड ब्रह्मांड व्यापून धरिलें । नाना शरीरीं विळासलें ।
विवेकी जनासी भासलें । जगदांतरी ॥ ११॥
आत्म्याविण देहे चालती । हें तों न घडे कल्पांतीं ।
अष्टधा प्रकृर्तीच्या वेक्ती । रूपासी आल्या ॥ १२॥
मूळापासून सेवटवरी । सकळ कांहीं आत्माच करी ।
आत्म्यापैलीकडे निर्विकारी । परब्रह्म तें ॥ १३॥
आत्मा शरीरीं वर्ततो । इंद्रियेंग्राम चेष्टवितो ।
नाना सुखदुःखें भोगितो । देह्यात्मयोगें ॥ १४॥
सप्तकंचुक हें ब्रह्मांड । त्यामधें सप्तकंचुक पिंड ।
त्या पिंडामधें आत्मा जाड । विवेकें वोळखा ॥ १५॥
शब्द ऐकोन समजतो । समजोन प्रत्योत्तर देतो ।
कठीण मृद सीतोष्ण जाणतो । त्वचेमधें ॥ १६॥
नेत्रीं भरोनी पदार्थ पाहाणें । नाना पदार्थ परीक्षणें ।
उंच नीच समजणें । मनामधें ॥ १७॥
क्रूरदृष्टी सौम्यदृष्टी । कपटदृष्टी कृपादृष्टी ।
नाना प्रकारींच्या दृष्टी । भेद जाणे ॥ १८॥
जिव्हेमधें नाना स्वाद । निवडून जाणे भेदाभेद ।
जें जें जाणें तें तें विशद । करुनी बोले ॥ १९॥
उत्तम अन्नाचे परिमळ । नाना सुगंध परिमळ ।
नाना फळांचे परिमळ । घ्राणइंद्रियें जाणे ॥ २०॥
जिव्हेनें स्वाद घेणें बोलणें । पाणीइंद्रियें घेणें देणें ।
पादइंद्रियें येणें जाणें । सर्वकाळ ॥ २१॥
शिस्नइंद्रियें सुरतभोग । गुदइंद्रियें मळोत्सर्ग ।
मनेंकरूनी सकळ सांग । कल्पून पाहे ॥ २२॥
ऐसें व्यापार परोपरी । त्रिभुवनीं येकलाचि करी ।
त्याची वर्णावया थोरी । दुसरा नाहीं ॥ २३॥
त्याविण दुसरा कैचा । जे महिमा सांगावा तयाचा ।
व्याप आटोप आत्मयाचा । न भूतो न भविष्यति ॥ २४॥
चौदा विद्या चौसष्टी कळा । धूर्तपणाच्या नाना कळा ।
वेद शास्त्र पुराण जिव्हाळा । तेणेंविण कैचा ॥ २५॥
येहलोकींचा आचार । परलोकीं सारासारविचार ।
उभय लोकींचा निर्धार । आत्माच करी ॥ २६॥
नाना मतें नाना भेद । नाना संवाद वेवाद ।
नाना निश्चय भेदाभेद । आत्माच करी ॥ २७॥
मुख्यतत्व विस्तारलें । तेणें तयास रूप आणिलें ।

येणेंकरितां सार्थक जालें । सकळ कांहीं ॥ २८ ॥
लिहिणें वाचणें पाठांतर करणें । पुसणें सांगणें अर्थ करणें ।
गाणें बाजवणें नाचणें । आत्म्याचकरितां ॥ २९ ॥
नाना सुखें आनंदतो । नाना दुःखें कष्टी होतो ।
देहे धरितो आणी सोडितो । नानाप्रकारें ॥ ३० ॥
येकलाचि नाना देहे धरी । येकलाचि नटे परोपरी ।
नट नाट्यकळा कुसरी । त्याविण नाहीं ॥ ३१ ॥
येकलाचि जाला बहुरूपी । बहुरूपी बहुसाक्षपी ।
बहुरूपें बहुप्रतापी । आणी लंडी ॥ ३२ ॥
येकलाचि विस्तारला कैसा । पाहे बहुविध तमासा ।
दंपत्येंविण कैसा । विस्तारला ॥ ३३ ॥
स्त्रियांस पाहिजे पुरुष । पुरुषासी पाहिजे स्त्रीवेष ।
ऐसा आवडीचा संतोष । परस्परें ॥ ३४ ॥
स्थूळाचें मूळ तें लिंग । लिंगामधें हें प्रसंग ।
येणें प्रकारें जग । प्रत्यक्ष चाले ॥ ३५ ॥
पुरुषांचा जीव स्त्रियांची जीवी । ऐसी होते उठाठेवी ।
परी या सूक्ष्माची गोवी । समजली पाहिजे ॥ ३६ ॥
स्थूळांकरितां वाटे भेद । सूक्षमीं आवघेंचि अभेद ।
ऐसें बोलणें निरुध । प्रत्यया आलें ॥ ३७ ॥
बायकोनें बायकोस भोगिलें । ऐसें नाहीं कीं घडलें ।
बायकोस अंतरी लागलें । ध्यान पुरुषाचें ॥ ३८ ॥
स्त्रीसी पुरुष पुरुषास वधु । ऐसा आहे हा समंधु ।
याकारणें सूक्ष्म संवादु । सुक्ष्मीं च आहे ॥ ३९ ॥
पुरुषइछेमधें प्रकृती । प्रकृतीमधें पुरुषवेक्ती ।
प्रकृतीपुरुष बोलती । येणें न्यायें ॥ ४० ॥
पिंडावरून ब्रह्मांड पाहावें । प्रचीतीनें प्रचीतीस घ्यावें ।
उमजेना तरी उमजावें । विवरविवरों ॥ ४१ ॥
द्वैतइछा होते मुळीं । तरी ते आली भूमंडळीं ।
भूमंडळीं आणी मुळीं । रुजु पाहावें ॥ ४२ ॥
येथें मोठा जाला साक्षेप । फिटला श्रोतयांचा आक्षेप ।
जे प्रकृतीपुरुषाचें रूप । निवडोन गेलें ॥ ४३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
महद्भूतनिरूपणनाम समास सातवा ॥ ७ ॥ १६.७

समास आठवा : आत्मारामनिरूपण

॥ श्रीराम ॥

नमूं गणपती मंगळमूर्ती । जयाचेनि मतिस्फूर्ती ।
लोक भजनी स्तवन करिती । आत्मयाचें ॥ १ ॥
नमूं वैखरी वागेश्वरी । अभ्यांतरीं प्रकाश करी ।
नाना भरोवरी विवरी । नाना विद्या ॥ २ ॥
सकळ जनांमधें नाम । रामनाम उत्तमोत्तम ।
श्रम जाउनी विश्राम । चंद्रमौळी पावला ॥ ३ ॥
नामाचा महिमा थोर । रूप कैसें उत्तरोत्तर ।
परात्पर परमेश्वर । त्रयलोक्यधर्ता ॥ ४ ॥
आत्माराम चहुंकडे । लोक वावडे जिकडे तिकडे ।
देहे पडे मृत्य घडे । आत्मयाविण ॥ ५ ॥
जीवात्मा शिवात्मा परमात्मा । जगदात्मा विश्वात्मा गुप्तात्मा ।
आत्मा अंतरत्मा सूक्ष्मात्मा । देवदानवमानवीं ॥ ६ ॥
सकळ मार्ग चालती बोलती । अवतारपंगतीची गती ।
आत्म्याकरितां होत जाती । ब्रह्मादिक ॥ ७ ॥
नादरूप जोतीरूप । साक्षरूप सत्तारूप ।
चैतन्यरूप सस्वरूप । द्रष्टारूप जाणिजे ॥ ८ ॥
नरोत्तमु विरोत्तमु । पुरुषोत्तमु रघोत्तमु ।
सर्वोत्तमु उत्तमोत्तमु । त्रयलोक्यवासी ॥ ९ ॥
नाना खटपट आणी चटपट । नाना लटपट आणि झटपट ।
आत्मा नसतां सर्व सपाट । चहुंकडे ॥ १० ॥
आत्म्याविण वेडें कुडें । अत्म्याविण मडें बापुडें ।
आत्म्याविण थडें रोकडें । शरीराचें ॥ ११ ॥
आत्मज्ञानी समजे मनीं । पाहे जनी आत्मयालागुनी ।
भुवनी अथवा त्रिभुवनीं । अत्म्याविणें वोस ॥ १२ ॥
परम सुंदर आणि चतुर । जाणे सकळ सारासार ।
आत्म्याविण अंधकार । उभय लोकीं ॥ १३ ॥
सर्वांगीं सिध सावध । नाना भेद नाना वेध ।
नाना खेद आणी आनंद । तेणेंचिकरितां ॥ १४ ॥
रंक अथवा ब्रह्मादिक । येकचि चालवी अनेक ।
पाहावा नित्यानित्यविवेक । कोण्हियेकें ॥ १५ ॥
ज्याचे घरी पद्मिणी नारी । आत्मा तंवरी आवडी धरी ।
आत्मा गेलियां शरीरीं । तेज कैचें ॥ १६ ॥
आत्मा दिसेना ना भासेना । बाह्याकारें अनुमानेना ।
नाना मनाच्या कल्पना । आत्मयाचेनी ॥ १७ ॥
आत्मा शरीरीं वास्तव्य करी । अवघें ब्रह्मांड विवरी भरी ।
वासना भावना परोपरीं । किती म्हणोनी सांगाव्या ॥ १८ ॥
मनाच्या अनंत वृत्ती । अनंत कल्पना धरिती ।
अनंत प्राणी सांगो किती । अंतर त्यांचें ॥ १९ ॥
अनंत राजकारणें धरणें । कुबुधी सुबुधी विवरणें ।
कळों नेदणें चुकावणें । प्राणीमात्रासी ॥ २० ॥
येकास येक जपती टपती । येकास येक खपती लपती ।
शत्रुपणाची स्थिती गती । चहुंकडे ॥ २१ ॥
पृथ्वीमधें परोपरीं । येकास येक सिंतरी ।
कित्तेक भक्त परोपरीं । परोपकार करिती ॥ २२ ॥
येक आत्मा अनंत भेद । देहेपरत्वें घेती स्वाद ।
आत्मा ठाईंचा अभेद । भेद हि धरी ॥ २३ ॥
पुरुषास स्त्री पाहिजे । स्त्रीस पुरुष पाहिजे ।
नवरीस नवरी पाहिजे । हें तों घडेना ॥ २४ ॥
पुरुषाचा जीव स्त्रीयांची जीवी । ऐसी नाहीं उठाठेवी ।
विषयसुखाची गोवी । तेथें भेद आहे ॥ २५ ॥
ज्या प्राण्यास जो आहार । तेथेंचि होती तत्पर ।

पशूचे आहारीं नर । अनादरें वर्तती ॥ २६॥
आहारभेद देहेभेद । गुप्त प्रगट उदंड भेद ।
तैसाचि जाणावा आनंद । वेगळाला ॥ २७॥
सिंधु भूगर्भींचीं नीरें । त्या नीरामधील शरीरें ।
आवर्णोदकाचीं जळचरें । अत्यंत मोठी ॥ २८ ॥
सूक्ष्म दृष्टीं आणितां मना । शरीराचा अंत लागेना ।
मा तो अंतरात्मा अनुमाना । कैसा येतो ॥ २९ ॥
देह्यात्मयोग शोधून पाहिला । तेणें कांहीं अनुमानला ।
स्थूळसूक्ष्माचा गलबला । गथागोवी ॥ ३० ॥
गथागोवी उगवाव्याकारणें । केलीं नाना निरूपणें ।
अंतरात्मा कृपाळुपणें । बहुतां मुखें बोलिला ॥ ३१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आत्मारामनिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥ १६.८

समास नववा : नाना उपासनानिरूपण
॥ श्रीराम ॥
पृथ्वीमधें लोक नाना । त्यास नाना उपासना ।
भावार्थें प्रवर्तले भजना । ठाई ठाई ॥ १॥
अपुल्या देवास भजती । नाना स्तुती स्तवनें करिती ।
जे जे निर्गुण म्हणिती । उपासनेसी ॥ २ ॥
याचा कैसा आहे भाव । मज सांगिजे अभिप्राव ।
अरे हा स्तुतीचा स्वभाव । ऐसा आहे ॥ ३ ॥
निर्गुण म्हणिजे बहुगुण । बहुगुणी अंतरात्मा जाण ।
सकळ त्याचे अंश हें प्रमाण । प्रचित पाहा ॥ ४ ॥
सकळ जनासी मानावें तें । येका अंतरात्म्यास पावतें ।
अधिकारपरत्वें तें । मान्य कीजे ॥ ५ ॥
श्रोता म्हणे हा अनुमान । मुळीं घालावें जीवन ।
तें पावे पानोपान । हे सध्या प्रचिती ॥ ६ ॥
वक्ता म्हणे तुळसीवरी । उदक घालावें पात्रभरी ।
परी न थिरे निमिषभरी । भूमीस भेदे ॥ ७ ॥
थोरा वृक्षास कैसें करावें । सेंड्या पात्र कैसें न्यावें ।
याचा अभिप्राव देवें । मज निरोपावा ॥ ८ ॥
प्रजन्याचें उदक पडतें । तें तों मुळाकडे येतें ।
हात चि पावेना तेथें । काये करिती ॥ ९ ॥
सकळास मूळ सांपडे । ऐसें पुण्य कैचें घडे ।
साधुजनाचें पवाडे । विवेकीं मन ॥ १० ॥
तथापी वृक्षांचेनि पडिपाडें । जीवन घालितां कोठें पडे ।
ये गोष्टीचें सांकडें । कांहींच नाहीं ॥ ११ ॥
मागील आशंकेचें निर्शन । होतां जालें समाधान ।
आतां गुणास निर्गुण । कैसें म्हणती ॥ १२ ॥
चंचळपणें विकारलें । सगुण ऐसें बोलिलें ।
येर तें निर्गुण उरलें । गुणातीत ॥ १३ ॥
वक्ता म्हणे हा विचार । शोधून पाहावें सारासार ।
अंतरीं राहातां निर्धार । नांव नाहीं ॥ १४ ॥
विवेकेंचि तो मुख्य राजा । आणि सेवकाचें नांव राजा ।
याचा विचार समजा । वेवाद खोटा ॥ १५ ॥
कल्पांतप्रळईं जें उरलें । तें निर्गुण ऐसें बोलिलें ।
येर तें अवघेंचि जालें । मायेमधें ॥ १६ ॥
सेना शाहार बाजार । नाना यात्रा लाहानथोर ।
शब्द उठती अपार । कैसे निवडावे ॥ १७ ॥
काळामधें प्रज्यन्यकाळ । मध्यरात्रीं होतां निवळ ।
नाना जीव बोलती सकळ । कैसे निवडावे ॥ १८ ॥
नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें ।
बहु ऋषी बहु मतें । कैसीं निवडावीं ॥ १९ ॥
वृष्टी होतां च अंकुर । सृष्टीवरी निघती अपार ।
नाना तरु लाहानथोर । कैसे निवडावे ॥ २० ॥
खेचरें भूचरें जळचरें । नाना प्रकारींचीं शरीरें ।
नाना रंग चित्रविचित्रें । कैसी निवडावीं ॥ २१ ॥
कैसें दृश्य आकारलें । नानापरीं विकारलें ।
उदंडचि पैसावलें । कैसें निवडावें ॥ २२ ॥
पोकळीमधें गंधर्वनगरें । नाना रंग लाहनथोरें ।
बहु वेक्ति बहु प्रकारें । कैसीं निवडावीं ॥ २३ ॥
दिवसरजनीचे प्रकार । चांदिणें आणी अंधकार ।
विचार आणी अविचार । कैसा निवडावा ॥ २४ ॥
विसार आणी आठवण । नेमस्त आणी बाष्कळपण ।
प्रचित आणी अनुमान । येणें रितीं ॥ २५ ॥
न्याय आणी अन्याय । होय आणी न होये ।
विवेकेंविण काये । उमजों जाणे ॥ २६ ॥
कार्यकर्ता आणी निकामी । शूर आणी कुकर्मी ।
धर्मी आणी अधर्मी । कळला पाहिजे ॥ २७ ॥
धनाढ्य आणि दिवाळखोर । साव आणि तश्कर ।
खरें खोटें हा विचार । कळला पाहिजे ॥ २८ ॥
वरिष्ठ आणि कनिष्ठ । भ्रष्ट आणी अंतरनिष्ठ ।
सारासार विचार पष्ट । कळला पाहिजे ॥ २९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
नाना उपासनानिरूपणनाम समास नववा ॥ ९ ॥ १६.९

समास दहावा : गुणभूतनिरूपण
॥ श्रीराम ॥
पंचभूतें चाले जग । पंचभूतांची लगबग ।
पंचभूतें गेलियां मग । काये आहे ॥ १॥
श्रोता वक्तयास बोले । भूतांचे महिमे वाढविले ।
आणि त्रिगुण कोठें गेले । सांगा स्वामी ॥ २ ॥
अंतरात्मा पांचवे भूत । त्रिगुण त्याचें अंगभूत ।
सावध करूनियां चित्त । बरें पाहें ॥ ३ ॥
भूत म्हणिजे जितुकें जालें । त्रिगुण जाल्यांत आले ।
इतुकेन मूळ खंडलें । आशंकेचें ॥ ४ ॥
भूतांवेगळें कांहीं नाहीं । भूतजात हें सर्व हि ।

येकावेगळें येक कांहीं । घडेचिना ॥ ५॥
आत्म्याचेनी जाला पवन । पवनाचेन प्रगटे अग्न ।
अग्नीपासून जीवन । ऐसें बोलती ॥ ६॥
जीवन आवघें डबाबिलें । तें रविमंडळें आळलें ।
वन्हीवायोचेन जालें । भूमंडळ ॥ ७॥
वन्ही वायो रवी नस्तां । तरी होते उदंड सीतळता ।
ते सीतळतेमधें उष्णता । येणें न्यायें ॥ ८॥
आवघें वर्मासी वर्म केलें । तरीच येवढें फांपावलें ।
देहेमात्र तितुकें जालें । वर्माकरितां ॥ ९॥
आवघें सीतळचि असतें । तरी प्राणीमात्र मरोनी जातें ।
आवघ्या उष्णेंचि करपते । सकळ कांहीं ॥ १०॥
भूमंडळ आळोन गोठलें । तें रविकिर्णें वाळोन गेलें ।
मग सहज चि देवें रचिलें । उपायासी ॥ ११॥
म्हणोनी केला प्रज्यन्यकाळ । थंड जालें भूमंडळ ।
पुढेंउष्ण कांहीं सीतळ । सीतकाळ जाणावा ॥ १२॥
सीतकाळें कष्टले लोक । कर्पोन गेलें वृक्षादिक ।
म्हणोन पुढें कौतुक । उष्णकाळाचें ॥ १३॥
त्याहिमधें प्रातःकाळ । माध्यानकाळ सायंकाळ ।
सीतकाळ उष्णकाळ । निर्माण केले ॥ १४॥
ऐसें येकामागें येक केलें । विलेनें नेमस्त लाविलें ।
येणेंकरितां जगले । प्राणीमात्र ॥ १५॥
नाना रसें रोग कठिण । म्हणोनी औषधी केल्या निर्माण ।
परंतु सृष्टीचें विवरण । कळलें पाहिजे ॥ १६॥
देहेमूळ रक्त रेत । त्या आपाचे होती दात ।
ऐसीच भूमंडळीं प्रचित । नाना रत्नांची ॥ १७॥
सकळांसी मूळ जीवन बांधा । जीवनें चाले सकळ धंदा ।
जीवनेंविण हरिगोविंदा । प्राणी कैचे ॥ १८॥
जीवनाचें मुक्ताफळ । शुक्रासारिखें सुढाळ ।
हिरे माणिके इंद्रनीळ । ते जळें जाले ॥ १९॥
महिमा कोणाचा सांगावा । जाला कर्दमुचि आघवा ।
वेगळवेगळु निवडावा । कोण्या प्रकारें ॥ २०॥
परंतु बोलिलें कांहींयेक । मनास कळावया विवेक ।
जनामधें तार्किक लोक । समजती आघवें ॥ २१॥
आवघें समजलें हें घडेना । शास्त्रांशास्त्रांसीं पडेना ।
अनुमानें निश्चय होयेना । कांहींयेक ॥ २२॥
अगाध गुण भगवंताचे । शेष वर्णूं न शके वाचें ।
वेदविधी तेहि काचे । देवेंविण ॥ २३॥
आत्माराम सकळां पाळी । आवघें त्रयलोक्य सांभाळी ।
तया येकेंविण धुळी । होये सर्वत्रांची ॥ २४॥
जेथें आत्माराम नाहीं । तेथें उरों न शके कांहीं ।
त्रयलोकीचे प्राणी सर्व हि । प्रेतरूपी ॥ २५॥
आत्मा नस्तां येती मरणें । आत्म्याविण कैचें जिणें ।
बरा विवेक समजणें । अंतर्यामीं ॥ २६॥
समजणें जें विवेकाचें । तेंहि आत्म्याविण कैचें ।
कोणीयेकें जगदीशाचें । भजन करावें ॥ २७॥
उपासना प्रगट जाली । तरी हे विचारणा कळली ।
याकारणें पाहिजे केली । विचारणा देवाची ॥ २८॥
उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेविण निराश्रयो ।
उदंड केलें तरी तो जयो । प्राप्त नाहीं ॥ २९॥
समर्थाची नाहीं पाठी । तयास भलताच कुटी ।
याकारणें उठाउठी । भजन करावें ॥ ३०॥
भजन साधन अभ्यास । येणें पाविजे परलोकास ।
दास म्हणे हा विश्वास । धरिला पाहिजे ॥ ३१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
गुणभूतनिरूपणनाम समास दहावा ॥ १०॥ १६.१०
॥ दशक सोळावा समाप्त ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni